सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ८७ | गुरुवार, दि. १८ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन



श्री. सारंग पाठक
पुरोहित, अमळनेर



श्री. अनिकेत कुलकर्णी
अमळनेर



श्री. राकेश पाटील
मा. सरचिटणीस - भाजपा अमळनेर

## दैनिविशेष

**दिनविशेष**
१८ डिसेंबर

- जगातील पहिला संप्रेषण उपग्रह, प्रोजेक्ट स्कोर, प्रक्षेपित करण्यात आला.
- सब्यसाची मुखर्जी यांनी भारताचे 20 वे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला.
- अहिंसक मार्गाने सामाजिक, आर्थिक आणि राजकीय बदल घडवून आणण्याच्या त्यांच्या प्रयत्नांसाठी टांझानियाचे माजी राष्ट्रपती ज्युलियस नायरेरे यांना पहिला आंतरराष्ट्रीय गांधी शांतता पुरस्कार प्रदान करण्यात आला.
- भारतीय ज्युनियर हॉकी संघाने बेल्जियमचा पराभव करून ज्युनियर हॉकी विश्वचषक जिंकला.

**अमळनेरच्या दाम्पत्याला मिळाले संरक्षक भिंतीचे पेटंट..!** पान ३ वर

## दै. 'ग्लोबल महातेज'च्या दणक्याचा परिणाम

# ग्रामीण रुग्णालय अखेर चकाचक






## आरोग्य प्रशासन खडबडून झाले जागे


रंगीत बेडशीटस्च्या आदेशाला केराची टोपली..!
अमळनेर ग्रामीण रुग्णालयातील भोंगळ कारभार चव्हाट्यावर...!!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा
रजनीकांत पाटील :
अमळनेर : संक्रमणजन्य आजारांचा धोका कमी करण्यासाठी राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये दररोज वेगवेगळ्या रंगांच्या, स्वच्छ व निर्जंतुक बेडशीट्स वापरण्याचे स्पष्ट निर्देश आरोग्य विभागाने दिले आहेत. मात्र, अमळनेर ग्रामीण रुग्णालयातील या आदेशाला केराची टोपली दाखविण्यात आली आहे. अनेक वॉर्डमध्ये जुन्या, झिजलेल्या बेडशीट्सचा वापर सुरू आहे. अनेक ठिकाणी तर बेडवर बेडशीट्सच नसल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे रुग्णांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. ग्रामीण रुग्णालयातील भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे.

"सध्या रुग्णालयात एकच रंगाच्या बेडशीट आहेत. वरिष्ठ पातळीवरून दुसरा पुरवठा अद्याप झालेला नाही. तर त्यातील काही निकामी बेडवरील बेडशीट धुण्यासाठी गेल्या असल्याने बेडवर नसतील. याबाबत कर्मचाऱ्यांना तातडीने कळवून व्यवस्था होईल.
– जी. एम. पाटील, वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय.

आरोग्य विभागाने जाहीर केलेला 'दररोज वेगवेगळ्या रंगांच्या बेडशीट्स'चा नियम अमळनेर ग्रामीण रुग्णालयात केवळ कागदापुरताच मर्यादित राहिल्याचा आरोप रुग्णांकडून होत आहे. स्वच्छ व निर्जंतुक चादरी मिळण्याऐवजी अनेक बेडवर जुन्या, मळका कापड अंथरलेले असल्याचे दिसते. विशेषतः शस्त्रक्रियेनंतरचे रुग्ण, महिला प्रसूती कक्ष तसेच बालरोग विभागात निष्काळजीपणा अधिक असल्याचे रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांचे म्हणणे आहे. यामुळे संसर्ग पसरण्याचा धोका वाढत असल्याची भीती व्यक्त होत आहे. रुग्णालयातील अपघात कक्षात कोणत्या दिवशी कोणत्या रंगाची बेडशीट वापरायची याबाबतचा चार्ट लावण्यात येतो. मात्र, ग्रामीण रुग्णालयात हा चार्ट कोठेच दिसून येत नाही. काही ठिकाणी बेडवरील गाद्या फाटलेल्या आहेत. त्यातील स्पंजही बाहेर आलेले आहेत. अशा अवस्थेत रुग्णांना उपचार देणे म्हणजे त्यांच्या आरोग्याशी तडजोड करण्यासारखेच असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. एकीकडे प्रशासनाकडून स्वच्छता, निर्जंतुकीकरण आणि रुग्णसुरक्षेबाबत आदेश काढले जात असताना, दुसरीकडे प्रत्यक्षात मात्र अंमलबजावणीचा अभाव स्पष्टपणे दिसून येतो. केवळ कागदी आदेशांवर समाधान न मानता रुग्णालय प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष द्यावे, नियमित स्वच्छ बेडशीट्स उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी होत आहे. यासाठी घेतला होता निर्णय एकाच बेडशीट्सचा दीर्घकाळ वापर झाल्यास त्यावर जंतू, जिवाणू, बुरशी वाढण्याचा धोका वाढतो. त्यामुळे रुग्णांमध्ये संक्रमण वाढण्याची शक्यता असते. हा धोका लक्षात घेऊन रुग्णालयातील स्वच्छतेसाठी रंगनिहाय बेडशीट वापरण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

कुठल्या दिवशी कोणता रंग ?
सोमवार व गुरुवार – पांढरा
मंगळवार व शुक्रवार – गुलाबी
बुधवार, शनिवार व रविवार – हिरवा

अमळनेर ग्रामीण रुग्णालयातील स्वच्छताच कोमात...!

आरोग्य केंद्रातच रुग्णांच्या आरोग्याशी उघडपणे खेळ...!!


दै. ग्लोबल महातेजने वेधले होते लक्ष....
दै. ग्लोबल महातेजने ग्रामीण रुग्णालयाच्या भोंगळ कारभाराविषयी मंगळवार, दि. २८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध केली होती. तसेच शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर २०२५ रोजी शवविच्छेदन गृहाची दयनीय अवस्था या दोन्ही बातम्यांसह ग्रामीण रुग्णालयातील अत्यंत गंभीर समस्यांना दै. ग्लोबल महातेजने वेळोवेळी वाचा फोडली आहे. मात्र, तेथील जबाबदार सुत्रांना याबाबत कोणतेही गांभीर्य नाही, हेच स्पष्ट होत आहे. आजही तेथील घाणीचे साम्राज्य व भोंगळ कारभार जैसे-थे आहे.

अमळनेर ग्रामीण रुग्णालयातील शवविच्छेदन गृहाची दयनीय अवस्था
नळाला गळती, चिखल, दुर्गंधीने आरोग्य धोक्यात!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अमळनेर : संपूर्ण राज्यात हुडहुडी भरविणाऱ्या थंडीचे प्रमाण वाढीस लागले आहे. त्यामुळे सर्दी, खोकला आणि श्वसनविकारांच्या रुग्णांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. मात्र, येथील ग्रामीण रुग्णालय रुग्णांना सेवा देताना असफल ठरत आहे. कारण रुग्णालयातील अस्वच्छता, बेडवरील घाणेरड्या व फाटलेल्या बेडशीट, तसेच एकूणच तेथे चालणारा अस्वच्छ व भोंगळ कारभार याबाबत प्रश्न उपस्थित करणारी बातमी दै. 'ग्लोबल महातेज'ने आज मंगळवार, दि. १६ डिसेंबर रोजी प्रसिद्ध केली होती. त्यानंतर आज बुधवार, दि. १७ डिसेंबर रोजी सकाळीच आरोग्य प्रशासन खडबडून जागे झाले.**

या बातमीचा परिणाम म्हणून अमळनेर ग्रामीण रुग्णालयाच्या आतील व बाहेरील संपूर्ण परिसराची स्वच्छता करण्यात आली. त्यामुळे परिसर आता चकाकत असून, रुग्णांच्या बेडवरील बेडशीटही स्वच्छतेसाठी देण्यात येऊन नवीन बेडशीट बेडवर टाकण्यात आले आहेत. रुग्णालयातील वॉर्ड, ओपीडी परिसर, शौचालये, प्रवेशद्वार, आवार तसेच आजूबाजूचा संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. अनेक दिवसांपासून सातत्याने तक्रारींचा विषय बनलेल्या या रुग्णालयात आता अस्वच्छता, साचलेला कचरा व दुर्गंधीवर अखेर उपाययोजना करण्यात आल्याचे चित्र दिसून आले आहे. तसेच उपचारार्थी रुग्णांनाही रुग्णालयातर्फे स्वच्छ बेडशीट उपलब्ध करून देण्यात आल्याने रुग्ण व नातेवाईकांनी समाधान व्यक्त केले आहे.



दरम्यान, आज तत्परतेने केलेल्या या कार्यवाहीचे स्वरूप तात्पुरते न राहता दररोज संपूर्ण परिसराची स्वच्छता होऊन बेडवरील बेडशीट वेळेवर बदलले जावेत, तसेच रुग्णालयातील सुविधांचा रुग्णांना अधिकाधिक चांगल्याप्रकारे लाभ द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. भविष्यात अशा प्रकारची अस्वच्छता व त्यामुळे निर्माण होणारी दुर्गंधी याकडे रुग्णालयातील अधिकाऱ्यांनी नियमितपणे देखरेख ठेवावी. वृत्तपत्रांनी बातम्या प्रसिद्ध केल्यानंतर आणि त्यामुळे सर्वत्र छी–तू झाल्यानंतरच सुधरावे, अशी कार्यपद्धती नको, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

## खा. शि. मंडळ निवडणूक

# एक वगळता सर्व उमेदवारांचे अर्ज वैध

### आता उत्कंठा माघारीची; फिल्डिंग सुरू; २० डिसेंबरपर्यंत मुदत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील सुपरिचित खान्देश शिक्षण मंडळाच्या त्रैवार्षिक निवडणूक २०२५ अंतर्गत आज बुधवार, दि. १७ डिसेंबर रोजी दुपारी १२ ते ४ या वेळेत उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया पार पडली. त्यात विठोबा आनंदा धनगर यांचा एकच उमेदवारी अर्ज दाखल होता. त्यात अनुमोदक म्हणून ज्ञानेश्वर गंगाराम पाटील यांचा सभासद क्रमांक व उमेदवार विठोबा धनगर यांचा आधार क्रमांक चुकीचा नोंदविल्यामुळे तो अवैध ठरविण्यात आला. याशिवाय इतर सर्व पदांसाठी दाखल झालेले उमेदवारी अर्ज वैध ठरविण्यात आले, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी पंडित रामचंद्र चौधरी यांनी दिली. दरम्यान, ही छाननीची प्रक्रिया निवडणूक उपसमितीमार्फत अतिशय पारदर्शक पद्धतीने करण्यात आली. पान ३ वर

**छाननीनंतर वैध ठरलेले विविध पदांचे उमेदवार**

**अध्यक्ष :** विनोद जगदीश अग्रवाल, किसन देवराम पाटील, डॉ. रवींद्र काशिनाथ कुळकर्णी, विक्रम विपीनचंद शाह, विजय जगन्नाथ बोरसे, लालचंद हेमनदास सैनानी, राकेश गिरधरलाल माहेश्वरी, संतोष बाबूराव पाटील, अक्षय नंदकिशोर अग्रवाल, अनिल मधुकर पाटील.

**उपाध्यक्ष :** सचिन बुधा पाटील, कमल आसकरण कोचर, माधुरी प्रमोद पाटील, नगीनचंद ग्यानचंद लोढा, सुभाष यशवंतराव पाटील, पुरुषोत्तम वसंत शेटे, संदीपकुमार केवलचंद जैन, मनीषा विवेकानंद लाठी.

**विश्वस्त :** वसुंधरा दशरथ लांडगे, नगीनचंद ग्यानचंद लोढा, सुभाष यशवंतराव पाटील, संतोष बाबूराव पाटील, पुरुषोत्तम वसंत शेटे, संदीपकुमार केवलचंद जैन.

**कार्यकारी मंडळ सदस्य :** निशांत राजेंद्र अग्रवाल, योगेश मधुसूदन मुंदडे, पंकज गोविंद मुंदडे, कल्याण साहेबराव पाटील, कमल आसकरण कोचर, हरी भिका वाणी, जितेंद्र मोहनलाल जैन, डॉ. अनिल नथ्थू शिंदे, प्रदीप कुंदनलाल अग्रवाल, नीरज दीपचंद अग्रवाल, डॉ. संदेश विपीन गुजराथी, प्रसाद रमेशचंद शर्मा, प्रवीण रामलाल जैन, विक्रम विपीनचंद शाह, लीना प्रवीण पाटील, संतोष बाबूराव पाटील, डॉ. रवींद्र काशिनाथ कुळकर्णी, दिलीप हरकचंद जैन, डॉ. अविनाश रघुराज जोशी, कल्याणराव वसंतराव पाटील, मनीषा विवेकानंद लाठी, जितेंद्र शांतीलाल झाबक.

# फोटोग्राफरने जपला प्रामाणिकतेचा आदर्श

### गलवाडे रस्त्यावर पडलेली बॅग रोख रकमेसह केली परत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील गलवाडेकडे जाणाऱ्या रस्त्यावर मंगळवार, दि. १६ डिसेंबर रोजी एक बॅग बेवारस स्थितीत पडलेली होती. याचवेळी फोटोग्राफर जयवंत ढवळे कार घेऊन डिझेल भरण्यासाठी जात होते. त्यावेळी बॅग त्यांना रस्त्यावर पडलेली दिसली. त्यावर त्यांनी या बॅगेच्या मालकिणीचा शोध घेऊन ती आदर्शवत कर्तव्य बजावत प्रामाणिकपणे सुपूर्द केली.



याबाबतची माहिती अशी, की निकिता स्वप्नील पाटील (रा. नंदुरबार) या छत्तीसगड येथे स्टेट बँक मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत. शुक्रवारी त्या त्यांचा भाऊ निकेत बोरसे यांच्या लग्नाकरिता येथे आलेल्या होत्या. रात्री ९ वाजेच्या सुमारास गलवाडे रस्त्यावर त्यांच्या डिकीतून बॅग रस्त्यावर पडली. त्यात २४ हजार २७० रुपये रोख, एटीएम कार्ड, लहान मुलीचे स्वेटर, टोपी, बँकेची पावती, शॉपिंग केल्याची पावती आदी साहित्य होते.

याचवेळी फोटोग्राफर ढवळे कारमध्ये डिझेल भरायला जात असताना त्यांना दिसली. त्यांनी बॅग उचलून तिच्या मालकाचा शोध घेण्याच्या निमित्ताने ती उघडली. तसेच तिच्यातील साहित्य तपासून पाहिले. त्यातील स्टेट बँकेची पावती पाहून त्यांनी अमळनेर येथील स्टेट बँकेतील अधिकाऱ्यांशी संपर्क केला.

मात्र त्यांना ना खातेदाराचा पत्ता अथवा नाव कळू शकले. मात्र, काहीही करून बॅग मालकाचा पत्ता शोधून त्यांची बॅग आणि पैसे परत करायचे, असा निर्णय घेत ढवळे यांनी यादृष्टीने पुन्हा प्रयत्न केला. अधिक बारकाईने बॅग तपासणी केल्यावर त्यांना शॉपिंगच्या पावतीवर ग्राहकाचा मोबाईल नंबर आढळून आला. त्यानंतर त्यांना खात्री पटली, की बॅग मालकाचा हा नंबर असावा. मंगळवारी त्यांनी सदर मोबाईल नंबरवर फोन केला असता त्यांच्याशी संवादानंतर सदर बॅग त्यांचीच असल्याचे समजले. त्यांनी बॅगेची ओळखही पटविली. त्यानंतर बॅगेच्या मालक निकिता यांनी आजोबा शांताराम गोविंदराव पाटील, नातेवाईक कैलास मधुकर बोरसे, भाऊ नवरदेव निकेश बोरसे यांना ढवळे यांची भेट घेण्यासाठी पाठविले. ढवळे यांनी त्यांना सदर बॅग प्रामाणिकपणे संपूर्ण वस्तू व पैशांसह परत केली. यावेळी संबंधित नातेवाईकांनी ढवळे यांचा या प्रामाणिकपणाबद्दल यथोचित सत्कार केला.



# पेन्शनर : समाजाचा आधारस्तंभ!




ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सेवानिवृत्तीचे उत्पन्न मिळावे, या उद्देशाने नॅशनल पेन्शन प्रणाली म्हणजेच ' एनपीएस ' १ जानेवारी २००४ रोजी सुरू करण्यात आली. पेन्शन सुधारणांची स्थापना करणे आणि नागरिकांमध्ये सेवानिवृत्तीसाठी बचत करण्याच्या सवयीला प्रोत्साहन देणे हे आहे. केंद्र, राज्य सेवा आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या सर्व पेन्शनधारकांसाठी १७ डिसेंबर हा दिवस महत्त्वाचा दिवस आहे. पेन्शनधारकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि पेन्शन व्यवस्थेला अधिक प्रभावी करण्यासाठी हा दिवस सुरू करण्यात आला आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या सन्मानार्थ, त्यांच्या समाजातील योगदानाचा सन्मान करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

नकेरा प्रकरणात भारतीय सर्वोच्च न्यायालयाने १७ डिसेंबर १९८२ रोजी एक महत्त्वपूर्ण निकाल दिला. सुनावणी करताना सरन्यायाधीशांनी ठामपणे सांगितले, की पेन्शन हे सरकारी बक्षीस नसून कर्मचाऱ्यांचा हक्क आहे. निवृत्तीच्या तारखेच्या आधारावर निवृत्तीवेतनाचे फायदे वाढविण्यात कोणताही भेदभाव केला जाऊ शकत नाही. पेंशनधारकांचे अधीक्षण पत्र म्हणूनही हा निर्णय मानला जातो. यामुळे १७ डिसेंबर राष्ट्रीय पेन्शन योजना म्हणून साजरा केला जातो.

### एका दृष्टिक्षेपात प्रकरण नाकारले

या प्रकरणात संरक्षण मंत्रालयाचे अधिकारी डी. एस. नकारा यांची मुख्य भूमिका होती. त्यांनी २५ मे १९७९ रोजी भारत सरकारच्या आदेशाविरुद्ध लढा दिला. त्यानंतरच उदार पेन्शन योजना सुरू करण्यात आली. या योजनेंतर्गत ३१ मार्च १९७४ पूर्वी सेवानिवृत्तीनंतरचा लाभ नाकारला गेला. नकारा सुद्दा या कार्यक्षेत्रात आले होते. ज्यामुळे त्यांनी खटला दाखल केला. एच.डी. शौरी यांनी नकारा यांना पीआयएल दाखल करण्यास मदत केली. या याचिकेत पेन्शनशी संबंधित मूलभूत मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. ज्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने पेन्शनबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यास भाग पाडले.

हे प्रकरण इतके महत्त्वाचे होते, की भारतातील न्यायालयीन सक्रियतेच्या पाच मान्यवर न्यायाधीशांनी हा निर्णय दिला. या प्रकरणात न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड, तत्कालीन सरन्यायाधीश, न्यायमूर्ती डी. ए. देसाई, न्यायमूर्ती ओ. चिन्नाप्पा. रेड्डी, न्यायमूर्ती व्ही. डी. तुळसपूरकर आणि न्यायमूर्ती बहरूल इस्लाम हे प्रमुख होते.

### भारतीय पेन्शन प्रणाली

या अंतर्गत कामगार कर्मचारी निवृत्तीवेतन योजना आणि कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संस्था (ईपीएफओ) कव्हर दिले जाते. १ जानेवारी २००४ रोजी किंवा त्यानंतर केंद्रीय सेवेत रुजू झालेले कर्मचारी नवीन पेन्शन सिस्टम (एनपीएस) अंतर्गत येतात.

### पात्रता अटी

कर्मचारी निवृत्तीवेतन योजनेचा लाभ घेण्यासाठी निवृत्तीवेतनाचे वय किमान दहा वर्षांच्या योगदानासह ५८ वर्षे आहे. त्याचवेळी उत्पन्नाशी संबंधित कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजनेसाठी निवृत्तीवेतनाचे वय ५५ वर्षे आहे. २०११ च्या जनगणनेनुसार सुमारे १२ टक्के कामगार (किंवा सुमारे ५८ मिलियन लोक) विविध पेन्शन सिस्टम अंतर्गत येतात. पेन्शनद्वारे संरक्षित कर्मचारी सरकारी, सरकारी उपक्रम, सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील उद्योजक नियुक्त करतात, ज्यांचे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेद्वारे (ईपीएफओ) मूलतः संरक्षण केले जाते. २० किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी ईपीएफओ कव्हर केले जातात . उर्वरित ८८ टक्के कार्यबल मुख्यतः असंघटित क्षेत्रांतर्गत (स्वयंरोजगार, रोजंदारीचे मजूर, शेतकरी इत्यादी.) आणि काही संघटित क्षेत्रातील आहेत, परंतु या ईपीएफओने समाविष्ट केलेले नाहीत. सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी (पीपीएफ) आणि पोस्टल सेव्हिंग योजना पारंपारिकरित्या मुख्य दीर्घकालीन बचत योजना असतात. परंतु केवळ थोड्या लोकांपुरतीच मर्यादित असतात.

### कर्मचारी भविष्य निर्वाह योजना

दरमहा १५ हजार किंवा त्याहून कमी मूलभूत पगाराचे कर्मचारी मासिक पगाराच्या १२ टक्के आणि नियोक्ताचे योगदान ३.६७ टक्के आहे. हे एकत्रित १५.६७ टक्के एकरकमी म्हणून जमा केले गेले आहे. तर दरमहा १५ हजारांपेक्षा जास्त पगाराचे कर्मचारी मासिक पगाराच्या १२ टक्के आणि नियोक्ता देखील १२ टक्के वाटा देतात. ही २४ टक्क्यांची संयुक्त ठेव आहे. ५५ वर्षे वयाची किंवा निवृत्तीनंतर पूर्ण रक्कम जमा केली जाते.

### भारतीय पेन्शन प्रणालीची समस्या

आयुर्मानात सुधारणा आणि प्रजनन दरामध्ये घट यामुळे लोकसंख्या वयाच्या रचनेत लक्षणीय बदल घडून येतो. वृद्धांचे प्रमाण (वय ६० वर्षे किंवा त्याहून अधिक) १९५१ मध्ये सुमारे १९०८ मिलियनपासून वाढून १९९१ मध्ये ५६.७ मिलियनवर पोहोचले. परिणामी वृद्धांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ५.५ ते ६.९ टक्क्यांपर्यंत वाढले. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार (१९९४) वृद्ध लोकांची टक्केवारी २०२० पर्यंत १०.३ टक्क्यांपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. १९९६ ते २०१६ पर्यंत वृद्ध नागरिकांची संख्या ६२.३ मिलियन ते ११२.९ मिलियन अशी वाढण्याची शक्यता आहे. भारतातील सध्याच्या निवृत्तीवेतन योजनांमध्ये प्रामुख्याने संघटित क्षेत्रातील कामगारांचा समावेश आहे, जे एकूण कामगारांच्या १० टक्क्यांच्या आसपास आहेत. म्हणूनच असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या बहुतांश कामगारांना वगळणे ही सध्याच्या व्यवस्थेची गंभीर समस्या आहे.

### सामाजिक सुरक्षा

जेव्हा लोकांचे नियमित उत्पन्नाचे साधन नसते तेव्हा पेन्शन योजना वृद्धापकाळात आर्थिक सुरक्षा आणि स्थिरता प्रदान करतात. सेवानिवृत्तीचे नियोजन हे सुनिश्चित करते, की पुढच्या काही वर्षांमध्ये लोक अभिमानाने आणि त्यांच्या राहणीमानात कोणतीही तडजोड न करता जगतील. संयुक्त राष्ट्रांच्या लोकसंख्या विभागाच्या म्हणण्यानुसार, २०५० पर्यंत जगाचे जीवनमान सध्याच्या ६५ वर्षांच्या पातळीवरून ७५ वर्षे जाण्याची शक्यता आहे. भारतातील आरोग्य आणि आरोग्याच्या चांगल्या स्थितीमुळे आयुष्यमान वाढले आहे. परिणामी, निवृत्तीनंतरच्या वर्षांची संख्या वाढते. अशाप्रकारे जगण्याची वाढती किंमत, महागाई आणि आयुर्मान निवृत्तीचे नियोजन करणे हे आजच्या जीवनाचा एक अनिवार्य भाग बनले आहे. जास्तीत जास्त नागरिकांना सामाजिक सुरक्षा देण्यासाठी भारत सरकारने कामगारांच्या सर्व क्षेत्रातील पेन्शन योजनांमधील सुधारणांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

# सिर्फ ५ हजार रुपये से की थी शुरुआत

## अब एक करोड़ का टारगेट है अगला पड़ाव, कैसे खुद लिखी अपनी किस्मत?

सक्सेस स्टोरी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अन्नू कनावत ने रीति-रिवाजों से जंग लड़कर खुद अपनी किस्मत लिखी है। वह जयपुर की रहने वाली हैं। उन्होंने कृषि-उद्यमिता के क्षेत्र में मिसाल कायम की है। सिर्फ ५००० रुपये के शुरुआती निवेश से अन्नू ने एक छोटे से कमरे में बटन मशरूम उगाना शुरू किया था। आज, उनका ' आमल्डा ऑर्गेनिक फूड्स एंड रिसर्च सेंटर ' १ करोड़ रुपये के रेवेन्यू का टारगेट लेकर चल रहा है। हेल्थ और वेलनेस पर फोकस्ड यह एग्री-बिजनेस नैचुरल मशरूम सप्लीमेंट्स और मशरूम उगाने का प्रशिक्षण देता है। अन्नू ने अपने दृढ़ संकल्प से पारंपरिक कृषि को एक सफल आयुर्वेदिक उद्यम में बदलकर दिखाया है। यही नहीं, किसानों और महिलाओं को भी सशक्त बनाया है। आइए, यहां अन्नू कनावत की सफलता के सफर के बारे में जानते हैं।



### चुनौतियों से भरा था शुरुआती सफर

राजस्थान के भीलवाड़ा जिले के एक रूढ़िवादी परिवार से आने वाली अन्नू कनावत को अकादमिक और पेशेवर विकास के लिए काफी संघर्ष करना पड़ा। १२ वीं के बाद आगे पढ़ने की उनकी इच्छा को परिवार से विरोध का सामना करना पड़ा। लेकिन, अन्नू ने हार नहीं मानी। उन्होंने अपने परिवार वालों से कहा कि अगर उनका किसी प्रतिष्ठित विश्वविद्यालय में दाखिला हो जाता है तो ही वे उनकी पढ़ाई का खर्च उठाएं। वरना जैसा परिवार का मन है, वह वैसा ही करेंगी। अन्नू सफल हुईं। उन्होंने महाराणा प्रताप कृषि एवं प्रौद्योगिकी विश्वविद्यालय से बीएससी (कृषि) की डिग्री ली। फिर गुजरात के एसडीएयू से एग्री-बिजनेस मैनेजमेंट में एमबीए किया। गुजरात में किसानों की प्रगतिशील खेती देखकर उनमें उद्यमिता का विचार आया। २०१६ में शादी के बाद जयपुर शिफ्ट होने और असिस्टेंट प्रोफेसर की नौकरी के दौरान भी वह अपना खुद का काम शुरू करने के बारे में सोचती रहीं। देहरादून में एक कॉलेज ट्रिप के दौरान उन्होंने मशरूम प्रशिक्षण कार्यक्रम में भाग लिया, जहां से उन्हें अपने उद्यम के लिए सही आइडिया मिला।

### सिर्फ पाच हजार रुपये से की शुरुआत

२०१८ में अन्नू ने पाच हजार रुपये के निवेश से १०x१० फीट के एक छोटे कमरे में बटन मशरूम उगाना एक प्रयोग के तौर पर शुरू किया। इसके लिए सर्दियों के कारण एसी की जरूरत नहीं पड़ी। प्रयोग सफल रहा। इससे उन्हें अपने खेती के तरीके पर भरोसा हो गया। इसके बाद उन्होंने भीलवाड़ा में तीन कमरों की एक बड़ी यूनिट स्थापित की। राष्ट्रीय कृषि विकास योजना से १५ लाख रुपये का अनुदान प्राप्त किया। उन्होंने महिलाओं के स्वास्थ्य लाभ और आसान खेती के कारण ऑयस्टर मशरूम उगाना शुरू किया। हालांकि, २०२० में कोरोना महामारी ने उनके सामने एक बड़ी चुनौती खड़ी कर दी। बिल्कुल तैयार ७०० किलो ऑयस्टर मशरूम को कोई खरीदार नहीं मिला।

### संकट को अवसर में बदल दिया

बाजार बंद होने पर अन्नू ने हार नहीं मानी और ऑयस्टर मशरूम को पीसकर पाउडर सप्लीमेंट में बदल दिया। उन्होंने इस पाउडर को अपने गांव की महिलाओं को बांटा, जिन्हें घुटनों और पीठ के दर्द जैसी समस्याओं में काफी राहत मिली। यह हाथ से बना मशरूम पाउडर उनकी नई पहचान और स्टार्टअप का 'हीरो प्रोडक्ट' बन गया। इन पाउडरों को बेचकर उन्होंने साडेतीन लाख रुपये का राजस्व कमाया। इसमें देड लाख रुपये का लाभ हुआ। इसी सफलता से प्रेरित होकर उन्होंने २०२१ में आमल्डा ऑर्गेनिक फूड्स एंड रिसर्च सेंटर की शुरुआत की। उन्होंने अपना ध्यान मशरूम के बड़े पैमाने पर उत्पादन से हटाकर महिलाओं और किसानों को प्रशिक्षण देने और मशरूम से बने आयुर्वेदिक सप्लीमेंट्स (जैसे 'श्रूम लेडी') के उत्पादन पर फोकस किया।

# कोण आहे प्रशांत वीर?

## आयपीएल इतिहासातील सर्वांत महागडा अनकॅप्ड खेळाडू

**चेन्नई सुपरगिंग्सने १४ कोटी २० लाखांना केली खरेदी**

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

प्रशांत वीरने आयपीएलच्या इतिहासात अनकॅप्ड खेळाडू म्हणून नवा इतिहास रचला आहे. चेन्नई सुपर किंग्स (सीएसके) ने आयपीएल २०२५ च्या लिलावात प्रशांत वीरला तब्बल १४ कोटी २० लाख रुपये देत आपल्या संघात सामील करून घेतले. यामुळे तो आयपीएल इतिहासातील सर्वांत महागडा अनकॅप्ड खेळाडू ठरला आहे. याआधी हा विक्रम आवेश खानच्या नावावर होता. ज्याला २०२२ च्या लिलावात लखनौ सुपर जायंट्सने १० कोटी रुपयांना विकत घेतले होते.

### कोण आहे प्रशांत वीर?

२० वर्षांचा डावखुरा फिरकी गोलंदाज ऑलराउंडर असलेला प्रशांत वीर सुरूवातीला अप टी २० लीगमध्ये नोएडा सुपर किंग्सकडून खेळताना चर्चेत आला. यावर्षी झालेल्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये त्याने केलेल्या दमदार कामगिरीमुळे तो अधिक प्रकाशझोतात आला. प्रशांत वीरच्या सातत्यपूर्ण प्रगतीकडे चेन्नई सुपर किंग्सचे लक्ष गेले. ' सीएसके 'ने त्याला ट्रायल्समध्ये जवळून पाहिले. कारण संघ रवींद्र जडेजा यांचा दीर्घकालीन पर्याय शोधत होता. याच कारणामुळे लिलावात ' सीएसके 'ने प्रशांत वीरसाठी जोरदार बोली लावली आणि अखेर त्याला आपल्या संघात सामील करून घेतले.

### गावात आनंदोत्सव

उत्तर प्रदेशातील अमेठी जिल्ह्यातील गुजीपूर गावाचा प्रशांत वीर जेव्हा एवढ्या मोठ्या रकमेला विकला गेला तेव्हा गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. लोकांनी त्याच्या आई-वडिलांना मिठाई भरवून शुभेच्छा दिल्या. प्रशांतची आई अंजना त्रिपाठी यांनी या आनंदाच्या क्षणी पती रामेंद्र त्रिपाठी यांना मिठाई भरवून आनंद साजरा केला.

### दमदार कामगिरीने मिळविली ओळख

प्रशांत वीरने उत्तर प्रदेशचा ऑलराऊंडर म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. तो पॉवर हिटिंगसाठी ओळखला जाणारा फलंदाज आहे. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये त्याने ७ सामने, १६९.१९ चा स्ट्राइक रेट, ३७.३३ च्या सरासरीने ११२ धावा अशी शानदार कामगिरी केली होती. प्रशांत वीर ३० लाख रुपयांच्या बेस प्राइससह लिलावात उतरला होता आणि थेट १४ कोटी २० लाख रुपयांपर्यंत त्याने मजल मारली. अप टी २० लीगमध्येही शानदार प्रदर्शन केले.

### अप टू २० लीगमधीले प्रशांत वीरची कामगिरी

१० सामने, ३२० धावा, ८ विकेट, १५५.३४ चा स्ट्राइक रेट अशी अष्टपैलू कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ' सीएसके 'साठी तो फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्ही विभागांत विशेषतः मिडल ओव्हर्समध्ये उपयुक्त पर्याय ठरू शकतो.




**आयपीएल इतिहासातील सर्वांत महागडे अनकॅप्ड खेळाडू**

प्रशांत वीर : चेन्नई सुपर किंग्स – १४ कोटी २० लाख रुपये (२०२५)
कार्तिक शर्मा : चेन्नई सुपर किंग्स – १४ कोटी २० लाख रुपये (२०२५)
आवेश खान : लखनौ सुपर जायंट्स – १० कोटी रुपये (२०२२)
कृष्णप्पा गौतम : चेन्नई सुपर किंग्स – ९ कोटी २५ लाख रुपये (२०२१)
शाहरुख खान : पंजाब किंग्स – ९ कोटी रुपये (२०२२)
राहुल तेवतिया : गुजरात टायटन्स – ९ कोटी रुपये (२०२२)
क्रुणाल पांड्या : मुंबई इंडियन्स – ८ कोटी ८ लाख रुपये (२०१८)
आकिब नबी : दिल्ली कॅपिटल्स – ८ कोटी ४० लाख कोटी रुपये (२०२५)
वरुण चक्रवर्ती : किंग्स इलेव्हन पंजाब – ८ कोटी ४० लाख रुपये (२०१९)

# कोणत्या झाडांचे लाकूड सर्वांत मजबूत?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

हजारो वर्षांपासून मानव लाकडाचा वापर करत आला आहे. घरबांधणी, फर्निचर, अवजारे तसेच मजबूत संरचना उभारण्यासाठी लाकूड महत्त्वाचे साधन ठरले आहे. मात्र प्रत्येक लाकूड सारखेच मजबूत नसते, हेही तितकेच खरे आहे. लाकडाची खरी ताकद त्याच्या आकारावर किंवा बाहेरील जाडीवर ठरत नाही, तर घनत्व, रेशांची रचना आणि टिकाऊपणा यांवर अवलंबून असते. जगभरात अशी अनेक झाडे आहेत, ज्यांचे लाकूड अत्यंत कठीण, जड आणि दीर्घकाळ टिकणारे असते. जगातील अशाच सर्वाधिक कठीण आणि मजबूत लाकूड देणाऱ्या झाडांची ही माहिती.



### ऑस्ट्रेलियन बुलोक

'जगातील सर्वाधिक कठीण लाकडांपैकी एक' असा 'ऑस्ट्रेलियन बुलोक' या झाडाचा उल्लेख केला जातो. हे झाड प्रामुख्याने ऑस्ट्रेलियात आढळते. या झाडाचे लाकूड अतिशय सघन असून त्यातील तंतू एकमेकांशी घट्ट जोडलेले असतात. लालसर-तपकिरी रंगाचे हे लाकूड ओरखडे, तडे आणि घर्षण यांना जबरदस्त प्रतिकार करते. हे लाकूड इतके मजबूत असते की ते कापणे किंवा कोरीव काम करणेही खूप कठीण जाते.



### आयरनबार्क

ऑस्ट्रेलियात उगवणारे आयरनबार्क हे युकॅलिप्टस वृक्षांचे एक प्रकार आहे. कठीण हवामान आणि निकृष्ट जमिनीतही हे झाड सहज वाढते. या लाकडामध्ये नैसर्गिक घटक असतात, जे त्याला कीड, ओलावा आणि कुजण्यापासून संरक्षण देतात. त्यामुळे आयरनबार्क लाकडाचा वापर प्रामुख्याने पूल बांधणी, रेल्वे स्लीपर आणि इतर जड कामांसाठी केला जातो.



### क्वेब्राचो

दक्षिण अमेरिकेत आढळणारे क्वेब्राचो हे झाड आपल्या विलक्षण कठीण लाकडासाठी प्रसिद्ध आहे. या लाकडाचे घनत्व इतके जास्त असते की ते पाण्यात टाकल्यास चक्क बुडते. गडद लालसर तपकिरी रंगाचे हे लाकूड प्रचंड दाब आणि वजन सहज सहन करू शकते. याच्या अत्यंत कठीण स्वरूपामुळे याचा वापर विशेषतः औद्योगिक कामांसाठी केला जातो.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com


## पशुपालकांना मोठा दिलासा!

# ‘ किसान क्रेडिट कार्ड’द्वारे मिळणार पशुधनासाठी सुलभ कर्ज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा : योगेश महाजन**

अमळनेर : पशुपालन व्यवसाय अधिक सक्षम व्हावा, यासाठी केंद्र सरकारच्या किसान क्रेडिट कार्ड कर्ज योजनेंतर्गत पशुपालकांना सुलभ व कमी व्याजदरात कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या योजनेचा लाभ दूध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळी-मेंढी पालन करणाऱ्या पशुपालकांना होणार आहे. या योजनेंतर्गत पशुखाद्य, चारा, औषधे तसेच दैनंदिन खर्चासाठी कर्ज मिळणार असून, ७ टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध आहे. नियमित परतफेड केल्यास यामधील ५ टक्के व्याज माफ होणार आहे. अनुदानामुळे योजनेनुसार प्रतिगाय १२ हजार रुपये, तर प्रतिम्हैस १४ हजार रुपये या मर्यादेत एक लाख ६० हजार रुपयांपर्यंत कर्ज मिळू शकेल.

शेळी-मेंढी पालनासाठी प्रतियुनिट १२ हजार ५०० ते २० हजार रुपये प्रतियुनिट (१०+ १ शेळी/मेंढी गट) या प्रमाणात कर्ज मिळेल. कुक्कुटपालनासाठी ८ हजार रुपये प्रति १०० ब्रॉयलर पक्षी, १५ हजार रुपये प्रति १०० लेयर पक्षी व ५ हजार रुपये प्रति १०० गावठी पक्षी या प्रमाणात कर्ज मिळेल. आधीपासून पीककर्जासाठी किसान क्रेडिट कार्ड वापरणाऱ्या शेतकऱ्यांना पशुपालनासाठी अधिक कर्ज वरील मर्यादेत वाढवून मिळू शकेल.




**आवश्यक कागदपत्रे**

या योजनेचा लाभ घेण्याकरिता अर्जासाठी आधार कार्ड, बँक पासबुक, रेशन कार्ड, पी.एम. किसान योजनेशी जोडलेले कागदपत्रे, जमीन उतारा (७/१२) तसेच दोन पासपोर्ट साईज फोटो आवश्यक आहेत. पशुपालकांनी अर्जासोबत पशुधनाची माहिती व १२ अंकी टॅग क्रमांक सादर करणे बंधनकारक आहे.

> *अमळनेर तालुक्यातील पशुपालकांनी या सुलभ कर्ज योजनेचा लाभ घ्यावा. अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. आवश्यक ती कागदपत्रे सोबत घेऊन नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधावा.*
>
> *– डॉ. संदेश वाठोरे,*
> *तालुका पशुवैद्यकीय अधिकारी,*
> *अमळनेर.*

## अमळनेरला सोमवारी लोकशाही दिन

**अमळनेर :** प्रशासकीय सुधार एवम् लोक शिकायत विभाग, कार्मिक लोक शिकायत आणि पेन्शन मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शनाखाली गुड गव्हर्नन्स वर्क अंतर्गत ‘ प्रशासन गाव की ओर’ ही विशेष मोहीम शुक्रवार, दि. १९ डिसेंबर २०२५ ते बुधवार, दि. २४ डिसेंबर २०२५ या काळात राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने सोमवार, दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता येथील पालिका सभागृहात लोकशाही दिनाचे आयोजन केले आहे. या लोकशाही दिनात तालुक्यातील विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित राहणार आहेत. यावेळी नागरिकांच्या समस्या, तक्रारी व निवेदनांची थेट दखल घेण्यात येणार आहे. नागरिकांनी विविध समस्या, व तक्रारींचे अर्ज सादर करून लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार रूपेशकुमार सुराणा यांनी केले आहे.

पान १ वरून

## एक वगळता सर्व उमेदवारांचे अर्ज वैध

दरम्यान, उमेदवारी अर्ज माघारीसाठीचे अर्ज संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. ते दि. १७ ते २० डिसेंबर २०२५ या काळात दररोज दुपारी ११ ते ३ या वेळेत स्वीकारले जाणार आहेत. माघारीसाठीचे अर्ज दाखल करताना उमेदवारांनी स्वतः उपस्थित राहणे अनिवार्य असल्याचे निवडणूक समितीने कळविले आहे.सदर छाननी प्रक्रियेसाठी निवडणूक उपसमितीचे अध्यक्ष पंडित रामचंद्र चौधरी, सदस्य विवेकानंद लक्ष्मण भांडारकर, मनोहर भगवान महाजन, प्रा. डॉ. सुनील लिंबाजी गरुड तसेच खानदेश शिक्षण मंडळाचे चिटणीस प्रा. पराग पी. पाटील यांच्यासह राकेश निळे व भटू चौधरी यांनी सहकार्य केले.




## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234



## ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन

# साने गुरुजी विद्यालयाने पटकावला प्रथम क्रमांक

### उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि मनोरंजनात्मक गणितील मॉडेलवरील उपकरणांवर अधिक भर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पंचायत समितीतील शिक्षण विभाग व सायरदेवी बोहरा सेंट्रल स्कूलतर्फे आयोजित ५३ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात साने गुरुजी विद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि मनोरंजनात्मक गणितीय मॉडेल या विषयावरील उपकरणे या शाळेच्या विद्यार्थ्यांनी अधिक प्रमाणात मांडली होती. त्याचप्रमाणे तालुक्यातून माध्यमिक गटातील ३३, उच्च प्राथमिक गटातील ३४ शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची एकूण आठ उपकरणे प्रदर्शनात मांडण्यात आली होती.

उपशिक्षणाधिकारी रागिणी चव्हाण व उपशिक्षणाधिकारी प्रतिमा सानप यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष सुरेंद्र बोहरा अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून गटशिक्षणाधिकारी प्रमोद पाटील, गटसमन्वयक रवींद्र साळुंखे, प्राचार्य जितेंद्र सिंह, प्राचार्य लक्ष्मण, प्राचार्य विनोद अमृतकार, केंद्रप्रमुख छगन पाटील, शरद सोनवणे, अशोक सोनवणे, दिलीप सोनवणे, राजेंद्र गवते, चंद्रकांत साळुंखे, डी. के. पाटील, ए. बी. धनगर व्यासपीठावर होते.

विज्ञान मंडळाचे तालुकाध्यक्ष निरंजन पेंढारे, गणित मंडळाचे अध्यक्ष डी. ए. धनगर, कार्याध्यक्ष संजय पाटील, भाग्यश्री वानखेडे, डॅफोडील सोनवणे, नवनीत सपकाळे यांचा याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. गटशिक्षणाधिकारी प्रमोद पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य जितेंद्र सिंह, मुकेश पाटील, नवनीत सपकाळे, रवींद्र साळुंखे यांनीही मनोगत व्यक्त केले. संजय पाटील, निरंजन पेंढारे, अलसीन पॉम यांनी सूत्रसंचालन केले. नेहा गुरव यांनी आभार मानले. यावेळी पंचायत समितीचे कर्मचारी देवेंद्र पाटील, प्रमोद पाटील, पंकज काटे, हंसराज पाटील, प्रशांत पाटील, पंकज महाजन, सीमा पाटील, रेखा वारडे, शीतल भदाणे, मुख्याध्यापक अनिल सूर्यवंशी, एन. वाय. साळुंखे यांचाही सत्कार करण्यात आला. प्रदर्शनस्थळी सायरदेवी बोहरा स्कूलतर्फे उत्कृष्ट सजावट करून विज्ञानमय वातावरण निर्माण केले होते. तसेच विद्यार्थी आणि शिक्षकांच्या भोजनाची व्यवस्थाही करण्यात आली होती. नवनीत सपकाळे, भूपेंद्र पाटील, पी. सी. पाटील, शैलेंद्र चव्हाण परीक्षक होते.

**गटनिहाय बक्षीस विजेते**

प्राथमिक गट : प्रथम : गीतेश निकम (साने गुरुजी विद्यालय), द्वितीय : समीक्षा बिऱ्हाडे (डी. आर. कन्या शाळा), तृतीय : जयेश पाटील (लोंढवे हायस्कूल ) , उत्तेजनार्थ : हितीका चोरडिया (सायरदेवी बोहरा स्कूल), ललित पाटील (के. पी. सोनार विद्यालय).

माध्यमिक गट : प्रथम : शुभम पाटील (साने गुरुजी विद्यालय), द्वितीय : योगेश पाटील (सायरदेवी बोहरा स्कूल), तृतीय : तनिष्का पाटील (एन. टी. मुंदडा ग्लोबल स्कूल), उत्तेजनार्थ : तमन्ना पावरा (यशवंत आश्रमशाळा, पिंपळे), राजवीर पाटील (सेंट मेरी हायस्कूल).

प्राथमिक शिक्षक गट : प्रथम : पल्लवी पाटील (जैतपीर हायस्कूल), द्वितीय : अर्जुन वसावे (जि. प. शाळा, टाकरखेडा), तृतीय : ऋत्विक जैन (एन. टी. मुंदडा ग्लोबल स्कूल).

माध्यमिक शिक्षक गट : प्रथम : यशोदा शिंदे (सायरदेवी बोहरा स्कूल), द्वितीय : डॉ. भाग्यश्री वानखेडे (जय योगेश्वर विद्यालय), तृतीय : आकाश पाटील (नगाव हायस्कूल).

प्रयोगशाळा परिचर गट : प्रथम : भाग्यश्री थोरात (सायरदेवी बोहरा स्कूल). बक्षीस वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी संजय पाटील होते. सर्व विजेत्यांना प्रमुख अतिथींच्या हस्ते ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.


# अमळनेरच्या दाम्पत्याला मिळाले संरक्षक भिंतीचे पेटंट..!


### केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरींकडून कौतुक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील जवखेडा येथील रहिवासी तथा प्रताप महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. विकास पाटील आणि वैशाली पाटील यांना भारत सरकारतर्फे संरक्षक भिंत क्षेत्रातील महत्त्वपूर्ण संशोधनाबद्दल बौद्धिक मालमत्ता हक्काचे (पेटंट) प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. बुधवार, दि. १० डिसेंबर रोजी हा सोहळा पार पडला. पाटील दाम्पत्य यापूर्वी पुण्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात (सीईओपी) प्राध्यापक म्हणून कार्यरत होते.

सन २००४ मधील त्यांच्या संयुक्त संशोधनातून निर्माण झालेल्या ग्रॅव्हीलॉफ्ट टेक्नॉलॉजीला भारत सरकारकडून पेटंट देण्यात आले आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचएआय) पुण्यातील चांदणी चौक





प्रकल्पात या तंत्रज्ञानाचा वापर केला. या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी ग्रॅव्हीलॉफ्ट तंत्रज्ञानाचे कौतुक करत डॉ. पाटील दाम्पत्याचा दिल्लीत यथोचित सत्कार केला. ग्रॅव्हीलॉफ्ट तंत्रज्ञानाचा वापर सरकारी यंत्रणांसह टाटा हौसिंग, पेनिन्सुला ग्रुप, लोढा ग्रुप यांसारख्या अनेक खासगी कंपन्यांनी त्यांच्या प्रकल्पांमध्येही केला आहे. नवीन पेटंट हायब्रीड रिटेनिंग वॉल ॲण्ड मेथड फॉर कंस्ट्रटिंग इट अंतर्गत डॉ. पाटील यांनी त्यांच्या ३५ वर्षांच्या व्यावसायिक अनुभवाचा उपयोग करून उंच संरक्षक भिंतींचा सुरक्षितता, टिकाऊपणा आणि शाश्वतता या अत्यंत महत्त्वाच्या घटकांवर आधारित अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित केले आहे. या संशोधनाला जागतिक स्तरावर नेण्यासाठी त्यांचा मुलगा मल्हार पाटील यांनी युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, बर्कले (यूएसए) येथून जिओसिस्टीम्स विषयातील एम.एस. पूर्ण केले आहे. यामुळे भारतीय संशोधन जागतिक पायाभूत क्षेत्रात अधिक प्रभावीपणे पोहोचेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पाटील दाम्पत्याच्या या संशोधनामुळे बांधकाम क्षेत्रातील टिकाऊपणा वाढून जनतेची सुरक्षा वाढणार असून, भविष्यातील धोके कमी होणार आहेत. पाटील दाम्पत्याच्या सन्मानामुळे अमळनेरच्या शिरपेचात आणखी एक तुरा खोवला गेला आहे.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
‘ चमकण्याची ’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षाखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |


* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.



# ॥ मंगल पान ॥

## का वाचावी ज्ञानेश्वरी ?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संत ज्ञानेश्वरांनी श्रीमदभगवद्गीतेत गहन तत्त्वज्ञान सर्वसामान्यांच्या भाषेत अर्थात मराठीत सोप्या आणि सुंदर ओव्यांच्या रूपात मांडले. ज्यामुळे आध्यात्मिक ज्ञान सर्वदूर पोहोचले. हा ग्रंथ केवळ मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखवत नाही, तर आधुनिक जीवनातील समस्यांवरही मार्गदर्शन करतो. मराठी भाषा व संस्कृतीचा एक अनमोल ठेवा आहे, जो ज्ञान, भक्ती आणि कर्माचा समन्वय साधतो.

१) सूर्य स्थिर आहे आणि पृथ्वी सूर्याभोवती फिरते हा शोध कोपर्निकसने लावला. माऊलीं ज्ञानोबारायांनी ज्ञानेश्वरीमध्ये ७२५ वर्षांपूर्वीच सूर्याचे भ्रमण हा भास आहे, हे वैज्ञानिक सत्य मांडले होते.

**उदय-अस्ताचे प्रमाणे ।**
**जैसे न चालता सूर्याचे चालणे ।**
**तैसे नैष्कर्म्यत्व जाणे ।**
**कर्मीचि असता ॥**

सूर्य चालत नसून चालल्यासारखा दिसतो. सूर्याचे न चालता चालणे हा ज्ञानेश्वरीतील क्रांतीकारक शोध आहे.

२) मानवी जन्माची प्रक्रिया कसल्याही उपकरणाची मदत न घेता ज्ञानेश्वर महाराज जेव्हा सांगतात तेव्हा नामांकित डॉक्टरांनाही आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. माऊली लिहितात,

**शुक्र-शोणिताचा सांधा ।**
**मिळता पाचांचा बांधा ।**
**वायुतत्व दशधा ।**
**एकचि झाले ॥**

शुक्रजंतू पुरुषाच्या वीर्यामध्ये असतात व शोणित पेशी स्त्रियांच्या बिजांड कोषात असतात. या शोणित पेशी अतिसूक्ष्मदर्शक यंत्राशिवाय दिसत नाहीत. सूक्ष्मदर्शक यंत्राचा शोध चारशे वर्षांतील आहे. परंतु माऊलींनी कसल्याही सूक्ष्मदर्शकाच्या मदती-शिवाय शोणित पेशींचा उल्लेख केला आहे. येथे त्यांच्यातील सर्वज्ञता दिसते.

३) पृथ्वी सपाट आहे की गोल या प्रश्नावर शास्त्रज्ञांत बराच काळ वाद चालला होता. पृथ्वी गोल आहे हा सिद्धांत आता जगन्मान्य झाला आहे.
माऊली ज्ञानोबारायांनी ज्ञानेश्वरीमध्ये ७२५ वर्षांपूर्वीच पृथ्वी गोल असल्याचे सांगितले.

**पृथ्वीये परमाणूंचा उगाणा घ्यावा ।**
**तरी हा भूगोलचि काखे सुवावा ।**
**तैसा विस्तारू माझा पाहावा ।**
**तरी जाणावे माते ॥**

भूगोल हा शब्दच ज्ञानेश्वरीने मराठीला दिला आहे. आणि पृथ्वी गोल असल्याचे निःसंदिग्ध सांगताना परमाणूचाही स्पष्ट उल्लेख केला आहे.

४) पाण्याच्या घर्षणातून जलविद्युत निर्माण होते. हा विजेचा शोधही शे-दीडशे वर्षांपूर्वीचा आहे, असे आपण मानतो.
परंतु माऊली ज्ञानोबाराय ७२५ वर्षांपूर्वीच सांगतात, की पाण्याचे जोरात घर्षण झाले की वीज तयार होते.

**तया उदकाचेनि आवेशे ।**
**प्रगटले तेज लखलखीत दिसे ।**
**मग तया विजेमाजी असे । सलील कायी ॥**

५) सागराच्या पाण्याची वाफ होते, त्याचे ढग बनतात व त्याला थंड हवा लागली की पाऊस पडतो. ही पाऊस पडण्याची प्रक्रिया विज्ञानाने अलीकडे शोधून काढली आहे. परंतु माऊली ज्ञानोबाराय ज्ञानेश्वरीमध्ये लिहितात, की सूर्याच्या प्रखर उष्णतेने मी परमात्माच पाणी शोषून घेतो व त्या वाफेचे ढगात रूपांतर करतो व इंद्रदेवतेच्या रूपाने पाऊस पाडतो. हे पावसाचे शास्त्रशुद्ध तंत्र सांगणारी ओवी अशी,

**मी सूर्याचेनि वेषे ।**
**तपे तै हे शोषे ।**
**पाठी इंद्र होवोनि वर्षे ।**
**मग पुढती भरे ॥**

६) विज्ञानाला सूर्यमालेतील ग्रहांचा शोध लागला आहे.
या विश्वाच्या पोकळीतील फक्त एकच सूर्यमाला मानवी बुद्धीला सापडली. अशा अनेक सूर्यमाला या पोकळीत अस्तित्वात आहेत. विश्वाला अनंत हे विशेषण लावले जाते. या विश्वात अनंत ब्रम्हांडे आहेत म्हणून भगवान अनंतकोटी ब्रह्मांडनायक ठरतात. परंतु माऊलीं ज्ञानोबारायांनी ७२५ वर्षांपूर्वीच सूर्यमालेतील मंगळ या ग्रहाबद्दल लिहिले आहे. विज्ञानाने शोध लावण्यापूर्वीच माऊली मंगळाचे अस्तित्व सांगतात,

**ना तरी भौमा नाम मंगळ ।**
**रोहिणीते म्हणती जळ ।**
**तैसा सुखप्रवाद बरळ । विषयांचा ॥**

किंवा

**"जिये मंगळाचिये अंकुरी ।**
**सवेचि अमंगळाची पडे पारी ।**

किंवा

**ग्रहांमध्ये इंगळ ।**
**तयाते म्हणति मंगळ ।**

इतकेच नव्हे, तर नक्षत्रांचेही उल्लेख आहेत. रोहिणीचा वरच्या ओवीत आलाय, तसेच मूळ नक्षत्रः

**परी जळो ते मूळ-नक्षत्री जैसे ।**

किंवा

**स्वाती नक्षत्रः**
**स्वातीचेनि पाणिये ।**
**होती जरी मोतिये ।**
**तरी अंगी सुंदराचिये ।**
**का शोभति तिये ॥**

कॅमेरा आणि पडद्यावर दिसणारा चित्रपट यांचे मूळही ज्ञानेश्वरीत सापडते.

**जेथ हे संसारचित्र उमटे ।**
**तो मनरूप पटु फाटे ।**
**जैसे सरोवर आटे ।**
**मग प्रतिमा नाही ॥**

अर्थात संकल्प-विकल्पांमुळे मनाचे चित्र उमटवणारे पटल किंवा पडदा फाटून जातो. चित्रपटासाठी पडदा आवश्यक आहेच किंवा सरोवरात पाणी असेल तरच आपली प्रतिमा त्यामध्ये उमटते. ते आटून गेले तर उमटत नाही. या सर्व ओव्यांचा आशय लक्षात घेतला तर ज्ञानेश्वरीची वैज्ञानिकता ध्यानात येईल.
विज्ञानयुगात दिशाभूल झालेल्या युवक-युवतींनी ज्ञानेश्वरीची ही शास्त्रीयता लक्षात घेऊन मानवी जीवनाचे यथार्थ दर्शन घडविण्याऱ्या संत वाङ्मयाच्या सहवासात यावे. म्हणूनच वाचावी ज्ञानेश्वरी.

# चित्रकलेचे विश्वविख्यात शिक्षक : प. पू. योगीराज गुळवणी महाराज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प. पू. योगीराज गुळवणी महाराजांचे प्राथमिक चौथीपर्यंतचे शिक्षण तारळे या छोट्याशा गावी झाले तालुक्यात पहिल्या नंबरने उत्तीर्ण झाल्यामुळे वामनला चौथीची स्कॉलरशिप मिळाली. बुद्धी एकाग्रचित्त, आकलनक्षम असून तिला तीव्रस्मरणशक्तीची जोड मिळाल्यामुळे एका प्रयत्नात सर्व काही मुखोद्गत होऊन जाई. कोल्हापूर येथील संस्कृत व्यासंगी जगद्गुरु पंडित आपटे व वे. शा. सं. आत्मरामाशास्त्री पित्रे यांच्याकडे संस्कृतचे अध्ययन झाले. विद्यार्थी दशेत असताना वामनराव पोहायला शिकले. व्यायामाची व चित्रकलेची ही त्यांना आवड होती. इयत्ता नववीत असताना त्यांच्या कलाशिक्षकानी त्यांच्या ठायी असलेले कला गुण हेरले. चित्रकलेची फर्स्ट ग्रेड व सेंकडग्रेड वामनराव उत्तम श्रेणीत उत्तीर्ण झाले. याचा त्यांच्या कला शिक्षकास सार्थ अभिमान होता. चित्रकलेची, थर्डग्रेड परीक्षा देण्यासाठी वामनरावानी मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मध्ये प्रवेश घेतला. याच वेळी मॅट्रीकला पण ते प्रविष्ट झाले. ' कोणती परीक्षा द्यावी '? हे द्वंद्व त्यांच्या मनात सुरु झाले. या द्वंद्वात मनस्वी कला विजयी झाली हे सांगणे नकोच! मॅट्रीकनंतर नोकरीची शाश्वती असताना देखील वामनरावानी ती वाट सोडून दिली. याच निर्णयाचा त्यांच्या संपूर्ण जीवनावर परिणाम होऊन गुळवणी ' ड्रॉईंग चे मास्तर ' म्हणून विश्वविख्यात झाले. याच कलागुणामुळे त्यांना प.पू. टेंबे स्वामींचे दर्शन घडले.

प. पू. योगीराज गुळवणी महाराजांचे थोरले बंधू शंकरशास्त्री यांनी प. पू. सद्गुरू टेंबे स्वामीना या विषयी सांगितल्यावर त्यांनी ' पत्रात लिही की येताना श्री दत्ताची प्रतिमा काढून गळ्यात श्लोकबद्ध हार घातल्यांचे दाखव आणि ते चित्र घेऊनच ये ' श्लोक बद्ध हारासाठी महाराजानी श्लोक सुद्धा दिला. पत्रा प्रमाणे प. पू. गुळवणी महाराजानी प्रत्यक्ष श्री दत्तप्रभूंच्या मूर्तीचे ध्यान केले. त्यावेळी उत्कट भक्ती मुळे त्यांना एकमुखी दत्तप्रभूंचे हृदयात साक्षात दर्शन झाले. तेच चित्र त्यांनी कागदावर साकारले व प. पू. सद्गुरू टेंबे स्वामीनी दिलेल्या श्लोकाला एक सुंदर हाराचे स्वरूप प्रदान केले. फुलांच्या चार पाकळ्या, व मध्यभागी पराग प्रत्येक पाकळीत मध्ये एक-एक अक्षर लिहून श्लोक बद्ध हार एक मुखी मूर्तीच्या गळ्यात घातला.
असे विशुद्ध भक्तीने भारलेले ते चित्र जेव्हा प. पू. टेंबेस्वामीनी पाहिले तेव्हा त्यांना अत्यानंद झाला, त्यांनी आपल्या परमशिष्यावर स्नेह दृष्टीने कृपावर्षाव केला. प. पू. टेंबे स्वामीनी प. पू. गुळवणी महाराजांची ही सेवा रुजु करुन घेऊन वामनरावांना हातात बांधण्यासाठी एक यंत्र करुन ते चांदीच्या पेटीत घालून ती पेटी स्वतःच्या हाताने वामनरावांच्या हातात बांधली. एक संरक्षक कवच प. पू. टेंबेस्वामीनी आपल्या परमप्रिय शिष्याच्या हातात बांधले ! हा दिवस होता नृसिंहवाडीकरांच्या परमभाग्याचा. तो म्हणजे गुरुव्दादशीचा ! या दिवशी प्राप्त झालेल्या या अनमोल ठेव्याची (संरक्षक कवचायी) आठवण सदैव रहावी म्हणून प. पू. गुळवणी महाराजानी प्रत्येक गुरुव्दादशीस नृसिंहवाडीस येण्याचा संकल्प सोडला.

गाणगापूरहून निघून सतत दोन महिने बऱ्याच अंशी अनवाणी पायी प्रवास करत, कधी उपाशी तर कधी अर्धपोटी राहून बऱ्याच वेळा अन्नपाण्याविनाही राहून दर्शन भेटीचा ध्यास घेऊन पायपीट करीत योगीराज गुळवणी महाराज कर्नाटकातील हावनूर येथे तुंगभद्रेच्या काठी त्रिपुरांतकेश्वराच्या मंदिरात प. पू. टेंबेस्वामी महाराजांच्या दर्शनासाठी पोहोचले. स्वामी महाराजांना पाहताच प. पू. गुळवणी महाराजानी साष्टांग दंडवत घातले व आनंदाश्रूंना वाट करून दिली. सलग अकरा दिवस हे गुरू-शिष्य एकत्र राहिले. तेथून परतताना प. पू. टेंबेस्वामीनी प. पू. गुळवणी महाराजांच्या डोक्यावर हात ठेवून कृपाशीर्वाद दिला प्रसाद नारळ, अंगारा देऊन सांभाळून राहण्याचा सल्ला दिला. जड अंतःकरणाने प. पू. योगिराज गुळवणी महाराजानी प. पू. टेंबेस्वामीना निरोप घेताना विचारले, ' महाराज, आता पुन्हा दर्शन '...? ते ऐकून प. पू. टेंबे स्वामीनी मानेला एक ऊर्ध्व झटका देऊन भावपूर्ण स्वरात सांगितले, ' हे असे लक्षात ठेव म्हणजे झाले!' समोर उभ्या असलेल्या वामनरावांना या वाक्या बरोबरच स्वामी महाराजांच्या शरीरातून निघालेली व्याघ्रांबरधारी एकमुखी श्री दत्त प्रभूंची मूर्ती साक्षात दिसू लागली. या मूर्तीचे चरण स्वामी महाराजांच्या हृदयाजवळ होते स्वामी महाराजांचे शरीर पारदर्शक होऊन त्या मध्येच व्याघ्रांबर पांघरलेली श्री दत्तप्रभूंची सुकोमल, प्रसन्न हास्य चेहऱ्यावर आसणारी मूर्ती वामनराव पहात होते त्या अवर्णनीय आनंदातून भानावर येत त्यानी स्वामीना पुन्हा साष्टांग नमस्कार घातला आणि वर पाहिले तर दत्तप्रभूंची मूर्ती नसून स्वामी महाराजच बसलेले आहेत.

' हे असे लक्षात ठेव म्हणजे झाले!' हे प. पू. टेंबेस्वामीचे शब्द व श्री दत्तप्रभूंची व्याघ्रांबरधारी मूर्ती चित्तात कोरून, एके दिवशी याच मूर्तीला भगवान दत्तात्रय यांच्या मनभावन मनोहारी रूपात चित्रित केले. एका चित्रकाराच्या अप्रतिम हस्त कौशल्याने जणू दत्तप्रभू कागदावर प्रकटले! तेव्हाचा प. पू. गुळवणी महाराजांचा आनंद अप्रतिम, अवर्णनीय होता हे मात्र निश्चित!
नागपूरजवळ भंडारा जिल्ह्यात वैतगंगा नदीच्या काठी पवनी हे गाव वसलेले आहे. या ठिकाणी प. पू. टेंबे स्वामींचा चातुर्मास सुरू होता. या क्षेत्री अनंत चतुर्दशीला प. पू. गुळवणी महाराजांना, त्यांच्या मातोश्री उमामाता व भगिनी गोदावरीसह मंत्र दीक्षा देताना प. पू. टेंबेस्वामींना खूप आनंद झाला.
प. पू. गुळवणी महाराज दैनंदिन कार्यक्रमात प्राणायामाचा अभ्यास करत असताना एके दिवशी त्यांच्या स्वप्नात प. पू. टेंबेस्वामी महाराज आले. ते म्हणाले, ' ही विद्या दत्त संप्रदायाची आहे. आम्ही एकच आहोत. तुझ्या हातून पुढे मोठे कार्य करुन घ्यावयाचे आहे. ही विद्या घे! ' स्वप्नातून जाग आल्यावर प. पू. गुळवणी महाराजानी समोर स्वामी चिन्मयानंदाना पाहिले व त्यांना नमस्कार केला. (हे स्वामी चिन्मयानंद म्हणजेच कलकत्याचे श्री योगेश चक्रवर्तीजी - योग साधनेव्दारा, शक्तिपात दीक्षेमुळे ते स्वामी चिन्मयानंद सरस्वती झाले - व कालांतराने गुरूदीक्षेमुळे ते प.पू. लोकनाथतीर्थ स्वामी झाले).

प. पू. टेंबेस्वामींच्या आदेश प्रमाणे प. पू. योगीराज गुळवणी महाराजानी प. पू. लोकनाथतीर्थ स्वामींच्या कडून शक्तिपात साधनेची दीक्षा घेतली. प. पू. लोकनाथतीर्थ स्वामींनी प. पू. गुळवणी महाराजांच्या मस्तकावर हात ठेवून परमेश्वर प्राप्तीचा हा मार्ग, अर्थात कुंडलिनी जागृती - शक्तिपात साधनेचा हा अमोघ ठेवा प्राप्त करुन दिला.

**शक्तिपात साधना व्याप्ती :** शक्तिपात (दीक्षा) साधना याचा सरळ सोपा अर्थ - गुरुकडून योग्य अशा शिष्याच्या निद्रिस्त शक्तीस जागृत करणे - त्याच्या वर गुरुकृपेचा वर्षाव करणे... कठीण गुरु साधनेसाठी शरीर वृत्ती तयार करणे, हा आहे.
अनेक गुरु भक्तांना प. पू. योगीराज गुळवणी महाराजानी शक्तिपात साधनेची दीक्षा दिली. ही दीक्षा देताना त्यांनी जात, धर्म पंथ, स्त्री-पुरुष असा कोणताही भेद केला नाही. ढाक्याहून मुंबईस आलेल्या एका मुस्लीमधर्मीय व्यक्तीस, जो भिकाऱ्याच्या वेशात हिंडत होता त्याला देखील शक्तिपात दीक्षा देऊन त्याला चरितार्थासाठी योग्य बनविले. शक्तिपात साधनेचे कार्य प. पू. गुळवणी महाराजांच्या संकल्प शक्तीने महाराष्ट्र प्रांत, संपूर्ण भारत- भारताबाहेर युरोप, अमेरिका, आफ्रिका इ. देशात पोहचले आहे. न्यूयॉर्क येथील श्री. वॉलकॉट यांना देखील पुण्यातूनच संकल्पाव्दारे प. पू. गुळवणी महाराजानी अनुग्रह दिला. हे त्यांचे शक्तिपात साधनेचे महान कार्य पाहून विष्णुतीर्थ स्वामी महाराजानी "शक्तिपात साधना" ही वेद प्राणित चैतन्यशक्ती दीक्षेच्या व्दारा गुरुकृपेच्या स्वरुपात या चैतन्यशक्तीचे संस्कारक्षम अनुभव प्रत्येक साधकाला येत असतात हे स्पष्ट करताना म्हटले की, या अंधकारपूर्ण युगात श्री गुळवणी महाराजांचा प्रभाव या प्रांतात चहू दिशांना सर्वत्र पसरत आहे, किंकर्तव्यमूढ होऊन भटकणाऱ्या लोकांना योग्य मार्गदर्शन करणाऱ्या दीपस्तंभाप्रमाणे त्यांचे कार्य आहे.
प. पू. टेंबेस्वामी महाराजानी नृसिंहवाडी मुक्कामी प. पू. योगीराज गुळवणी महाराजांच्या हातात गुरुव्दादशी दिवशी चांदीच्या पेटीत घालून एक यंत्रसंरक्षक कवच बांधले असल्यामुळे गुरुकृपेची आठवण सतत राहण्यासाठी प. पू. गुळवणी महाराजानी प्रत्येक गुरुव्दादशीस नृसिंहवाडीस येण्याचा संकल्प सोडला. मनोमन ठरवले. त्या नुसार ते प्रत्येक गुरुव्दादशीस न चुकता येत असत. त्या पवित्र दिवशी नृसिंहवाडीतील माता- भगिनी परंपरेनुसार प्रथम देवाला ओवाळून मग प. पू. गुळवणी महाराजाना देखील ओवाळत असत. प. पू. गुळवणी महाराज प्रत्येक सुवासिनीस एक रुपया ओवाळणी घालत. एका गुरुव्दादशीस ओवाळणीसाठी प. पू. गुळवणी महाराजांकडील पाचशे रुपये खर्च झाले. याचाच अर्थ त्या दिवशी सुमारे पाचशे सुवासिनीनी महाराजांना ओवाळले, औक्षण केले!
प. पू. योगीराज गुळवणी महाराज बालपणापासूनच नृसिंहवाडीस येत होते. नृसिंहवाडीतील त्यांचा दिनक्रम - पहाटे उठून कृष्णेचे स्नान करणे, श्री चरणांवर पाणी घालणे, माधुकरी मागणे, अनुष्ठान, महापूजा करणे, श्रीदत्तप्रभूंची यथाशक्ती सेवा करणे, अन्नदान करणे इत्यादि ते अंतःकरणपूर्वक समर्पित भावनेने आनंदाने करीत असत. एकदा तर देवस्थान समितीने वाडी बाहेरच्या कोणाही व्यक्तीला श्री स्वामीच्या चरणावर पाणी घालण्यासाठी बंदी केली होती. प. पू. गुळवणी महाराजाना ही बंदी म्हणजे एक प्रकारची शिक्षाच वाटू लागली. त्यांनी आपल्या मनातील ही खंत पुजारीजनांना बोलून दाखविली. प्रत्यक्ष श्री दत्तप्रभूनी पुजाऱ्यांना विचार प्रवृत्त करायला लावून प. पू. गुळवणी महाराजाना या कठीण नियमातून मुक्त करून आपल्या पादुकांवर पाणी घालण्याची इच्छा पूर्ण करुन घेतली. या बाबतीत पंडित श्री. आत्माराम शास्त्री जेरे पुजारी यांनी पुढाकार घेऊन प. पू. गुळवणी महाराजांची श्री पादुकावर पाणी घालण्याची नित्य सेवा अबाधित ठेवली. या वरुन श्रीदत्तप्रभूंचा प. पू. गुळवणी महाराजांवरील लोभच दृष्टोत्पत्तीस येतो. नरसोबावाडीस असताना प. पू. योगीराज गुळवणी महाराज रोजच्या पहाटेच्या काकड आरतीला न चुकता उपस्थित राहात. देवासमोरच्या खांबा जवळची जागा एक शिंपी न चुकता त्यांच्यासाठी धरून ठेवत असे. त्या खांबा जवळून प. पू. गुळवणी महाराजाना दरवाजा उघडल्यावर श्री दत्तप्रभूंचे अगदी व्यवस्थित दर्शन घडत असे. त्या शिंप्यास ते प्रतिवर्षी धोतर जोडी प्रसाद म्हणून देत असत.

प. पू. योगीराज गुळवणी महाराजानी वंदनीय अशा नृसिंहवाडीतील श्री दत्त मंदिर व परिसरातील अनेक मंदिर वास्तूंचे जीर्णोद्धार केले. जुन्या ओवऱ्या पाडून नवीन प्रशस्त ओवऱ्या बांधल्या. श्रीराममंदिर, नारायणस्वामी, गोपाळस्वामी मंदिर, श्री ब्रम्हानंद स्वामी मठाचे नूतनीकरण केले. श्री उमामातेच्या स्वामी भेटीच्या जागी एक तुळशी वृंदावन उभे केले. प्रशस्त धर्मशाळा बांधली सर्वात उल्लेखनीय व अविस्मरणीय कार्य म्हणजे प.पू. योगीराज गुळवणी महाराजानी प्रदक्षिणा मार्गी बांधलेली गोलाकार शिल्प कृती ! सभा मंडप- उत्कृष्ट शिल्पकृतीचा एक नमूना ! मजबूत पायावर सोळा खांबावर आधारलेली कमळाच्या कोरीव कामाने सजलेली ३५० टन वजनाची मजबूत गोलाकार स्लॅब - बांधकाम क्षेत्रातील एक नवलच आहे ! भव्य दिव्य उत्कृष्ट शिल्पकृती ! हा सभा मंडप उत्तम नटलेला असून त्यात गुरुचरीत्रातील उल्लेखनीय प्रसंग चित्रित केले आहेत. प. पू. योगीराज गुळवणी महाराजांच्या संकल्पातून साकारलेला हा गोलाकार प्रदक्षिणा मंडप पाहताना श्री दत्तचरणी लीन झालेले मन प. पू. योगीराज गुळवणी महाराजांच्या देखील सुकोमल चरणांवर भक्तीभावाने मस्तक टेकते ! ज्यांच्याकडून काम करून द्यायचे असते त्याला प्रत्यक्ष श्री दत्तप्रभूच अशी प्रेरणा देतात हे वादातीत सत्य नृसिंहवाडीकर नित्य अनुभवत असतातच.
प. पू. योगीराज गुळवणी महाराजांच्या मनी मानसी अहर्निश नृसिंहवाडीच वसली होती. कारण प्रत्येक वेळी वाडीस येताना पाट्याभरुन पिवळी शेवंतीची फुले ते श्रीचरणांवर अर्पण करण्यासाठी घेऊन येत असत. वाडीस असताना कित्येक वेळा पार्सलने देखील त्यांनी पिवळी शेवंती मागवून घेतली होती. नृसिंहवाडीहून कोणी व्यक्ती आली किंवा पुण्याहून कोणी वाडीस जाणारी व्यक्ती भेटली तर त्याच्याबरोबर प. पू. गुळवणी महाराज पिवळ्या शेवंतीची हाराभर फुले न चुकता पाठवत असत. सर्व काही आपल्या लाडक्या आराध्य दैवतासाठी! स्वारींच्या पोशाखातील जरीची पगडी देखील प. पू. गुळवणी महाराजांनी मापाप्रमाणे बनवून वाडीस श्री स्वारींच्या सेवेस पाठवून दिली होती. देवासाठी उत्तमतेचा ध्यासच जणू प. पू. गुळवणी महाराजानी घेतला होता वाडीस दरवर्षी गुरुव्दादशीस जाताना श्री दत्तप्रभूंना अर्पण करण्यासाठी उत्तम छाट्या बेळगाव, धारवाडच्या हातमाग वाल्यांकडून ते मागवून घेत. श्री दत्त प्रभूना अर्पण करण्याचे उत्कृष्ट केशर ते थेट काश्मीरहून मागवून घेत असत. ऑगस्ट १९७३ मध्ये प.पू. योगीराज गुळवणी महाराजानी आपल्या जवळील सर्व चांदीची भांडी तसेच त्यांच्या रौप्य तुलेतून जमा झालेली सर्व चांदी मंडप शिल्पाचे इंजिनियर साहेब श्री. वि. मो. वैद्य यांच्याकडे दिली व सांगितले की ही सर्व भांडी आटवून वाडीच्या देवाचे दरवाजे चांदीने मढवा. हीच सर्व चांदी आटवून प. पू. योगीराज गुळवणी महाराजांच्या इच्छेप्रमाणे श्री. दत्तप्रभूंचे दर्शनी दरवाजे चांदीने मढवलेले आहेत. अशा प्रकारे त्यांनी आपल्या इष्टदेवासाठी सर्वस्व वेचले. पण कुठे ही वाच्यता नाही ! जाहिरात नाही..!
परमेश्वरांचेच परमेश्वराला । हीच पराकोटीची निस्वार्थी भावना त्यामागे कार्यरत होती असेच म्हणावे लागेल...! जन्मास येणे ही सूर्योदयाप्रमाणे एक नैसर्गिक घटना आहे. तद्वत मृत्यू हे सूर्यास्ताइतके गहिरे सत्य आहे. या दोन्ही घटनांच्या मधला काळ हेच मानवी जीवन व त्याचे कार्य मानावे लागेल. परमपूज्य योगीराज गुळवणी महाराजांचे संपूर्ण जीवन हे गुरूसेवेला वाहिलेले होते. एका मुमुक्षू जीवनाचे शक्तिपात साधनेने व अखंड भक्तीने एका शक्तिपाताचे महामेरूमध्ये रूपांतर झाले होते. प. पू. सद्गुरू टेंबे स्वामी महाराज व प. पू. लोकनाथतीर्थ स्वामींच्या या परमशिष्याने अनेकांचे संसार फुलवले अनेकांना शक्तिपात साधनेची प्राप्ती करून दिली. अनेक स्त्री - पुरुषांचे पारमार्थिक जीवन समृद्ध केले. शक्तिपात साधनेचा वारसा जपणारा शिष्य संप्रदाय यांच्याच कृपाशीर्वादाने निर्माण झाला. गुरुभक्तीची अवीट गोडी अनेक भक्तांना यांनी लावली. कित्येकांचे जीवन अक्षरशः सुवर्णकांती प्रमाणे उजळून टाकले. जो प. पू. गुळवणी महाराजांच्या सानिध्यात आला. त्याच्या ऐहिक व पारमार्थिक जीवनाचे विशुद्ध कल्याणच झाले! प. पू. गुळवणी महाराजानी स्वतःकडे कांही ही शेष न ठेवता दोन्ही हातांनी भरभरून वाटले. परमेश्वरी कृपेचा खजिनाच जणू सर्व भक्तांमध्ये रिता केला!



## दत्त म्हणता काय उणे ?

**उभी त्रिमूर्ती साक्षात । काळजाच्या पायावाटे उतरे काळजात...॥**

या उक्तीप्रमाणे देण्यासाठी जन्म आपुला! दत्त म्हणजे दिले ! हेच प.पू. गुळवणी महाराजानी आपल्या जगण्यांतून सिद्ध केले त्यांचे जीवन कार्य हे श्री दत्तप्रभूंच्या कृपाशीर्वादाचेच फलित होते त्यांची दृष्टी, संकल्प, त्यांची स्वप्ने, त्या स्वप्नांची परिपूर्ती, सामान्यालाही असामान्य घडविणारी त्यांची कृपा दृष्टी सारे कांही अलौकिकच ! या सर्वांचे वर्णन करताना वाणी मूक होते, लेखणी मूक होते, अनिमिष नेत्रांनी नुसते पाहणेच उरते! कारण दृष्य केवळ हृदय पटलावर अंकित करून नेत्र ही मूक होतात. मन हृदय तर या श्रेष्ठ विभूतीच्या सामर्थ्याच्या प्रभावाने अधीच भारून गेलेले असते, त्यामुळे ते ही मुके! यासर्व मुक्या घटकांनी प. पू. गुळवणी महाराजांची थोरवी ती काय वर्णावी. ?
श्री गुळवणी महाराज म्हणतात, की उठणे, बसणे, जप करणे, वाचन करणे, गप्पागोष्टी करणे, चेष्टा विनोद करणे वगैरे सर्व क्रियांमध्ये भगवंताशी संबंध आणि संदर्भ असावा, हेच अनुसंधान. भगवंताचे अनुसंधान आपल्याला भगवंता कडे घेऊन जाते. दिवा जळायला हवा असेल तर त्यामध्ये सतत तेल घातले पाहिजे तसे भगवंताचे अनुसंधान राहण्यासाठी त्याचे नामस्मरण आपण सतत करीत असावे.

# कर्माची सूत्रे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कर्माची सूत्रे अतिशय गहन असतात. आयुष्यात घडणारी प्रत्येक घटना अथवा प्रत्येक जीवाशी या जन्मात घडलेली येथील भेट ही आपले कार्मिक अकाऊंट्स क्लीअर करण्यासाठी झालेली असते. ' ऋणानुबंधाशिवाय एखादे रोपही आपल्या अंगणात फुलत नाही. अनंत जन्मांत प्रत्येक जीवाशी होत असलेला एनर्जी एक्सचेंज पुनःपुनः भेटी घडविण्यास कारणीभूत ठरत असतो.' कोणास दिलेला अथवा घेतलेला एक रुपयासुद्धा चुकविण्यास पुढील जन्मी यावे लागते, म्हणून शक्यतोवर कोणाचेही ऋण आपल्यावर ठेवू नये. आपली ही सत्कर्मे किंवा दुष्कर्मेच पुढे संचित रूपाने आपले प्रारब्ध ठरत जातात. ' सत्कर्मांची वाढ झाली की आपल्या नित्य ' जवळच ' असलेले गुरुतत्त्वं अनुभवास यायला सुरूवात होते, गुरू कधीही ' करावे ' लागत नाहीत, ते जन्मोजन्मी आपल्यासोबतच असतात. आपल्यातील शिष्य जागा होणे गरजेचे असते, इतकेच! '
एकदा सद्गुरूंचा अनुग्रह प्राप्त झाला, की आपण आपल्या प्रत्येक कर्मास ' सद्गुरूरार्पण ' करावयास शिकतो, मी जे करतोय ते कोणती तरी शक्ती माझ्याकडून करवून घेतेय ही ' विनम्रता ' अंगी रुजते आणि मग अर्थातच ' कर्तेपणाचा ' अहंकार गळून पडल्याने हातून घडणारे प्रत्येक कर्म ' अकर्म ' घडून कर्मबंधनातून हळूहळू मुक्त होण्यास आरंभ होतो. म्हणूनच सद्गुरूकृपेचे महत्त्वे अनन्यसाधारण आहे. तरी प्रारब्धभोग टळत नाहीत, गुरुकृपेने सौम्य प्रकारचे प्रारब्ध टळू शकते, पण तीव्र प्रारब्धकर्म भोगणे अनिवार्य असते. गुरू ते सोसण्यासाठी बळ देतात. कठीण काळात देखील शिष्याच्या चेहऱ्यावरची प्रसन्नता आणि आत्मिक समाधान कधीही कमी होऊ देत नाहीत. भिंतीवर मारलेला चेंडू बुमरँग होऊन आपल्याजवळ येणारच, फक्त त्याची आपल्यावर येऊन आपटण्याची तीव्रता गुरूकृपेने कमी होते.
आपल्या चांगल्या-वाईट कर्मांपासून आपली सुटका कधीही नसते, म्हणून हातून घडणारे प्रत्येक कर्म जागृतपणे, परमेश्वराला समर्पित, स्वार्थविरहित, 'आत्म्यास पटलेले', सत्याच्या आधारावर असलेलेच घडावे. मनाविरुद्ध, केवळ जगाला दाखवायला, हृदय साथ देत नसलेले कोणतेही कर्म कधीही करु नये ते यासाठी.
ज्योतिष्य आपल्याला आपल्या पूर्वसंचितानुसार घडणाऱ्या घटनांचा केवळ आलेख देते, पण गुरूकृपा आज्ञाचक्र जागृत करून ' कर्माप्रती सजग ' करत जाते. म्हणून एकदा गुरू आयुष्यात आल्यानंतर विवेकी जीव सहसा, ग्रह, तारे, नक्षत्र, पत्रिका यात भरकटत बसत नाही! तर सगळे ग्रह ज्याचे अंकित आहेत अशा सद्गुरूंना संपूर्णतः शरण जातो.

(वरील माहिती विविध धर्म ग्रंथातून संकलीत केली आहे.)